सकाळ
उदय भविष्यपत्राचा



# कॅन्सरग्रस्तांसाठी ३०० खाटांचे रुग्णालय

मुंबई, ता. २५ : लीलावती हॉस्पिटलने नवीन कॅन्सर केअर इन्स्टिट्युट सुरू केले आहे. या कार्यक्रमादरम्यान कॅन्सरग्रस्तांसाठी मुंबईत ३०० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याची घोषणा करण्यात आली. या रुग्णालयासाठी जागेची पूर्तता राज्य सरकार करेल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.

नवीन कॅन्सर केअर इन्स्टिट्युटसाठी नर्सिंग एक्सलन्स प्रोग्राम सुरू करण्यासाठी मेयो क्लिनिकसोबत करार केला आहे. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी अमेरिकेतील जगप्रसिद्ध मेयो क्लिनिकसोबत उचललेले हे पाऊल हे वैद्यकीय क्षेत्रात आणखी प्रगती घडवून आणेल. तसेच लीलावती हॉस्पिटल आणि मेयो क्लिनिकने स्थापन केलेल्या रुग्णालय नसून आरोग्य मंदिर असल्याचे त्यांनी सांगितले. या विशेष प्रशिक्षण आणि विकासाद्वारे नर्सिंग कर्मचाऱ्यांचे कौशल्य आणि ज्ञानात भर पाडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.